ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

डॉ.रमेश के.शेंडे
मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय ,नरखेड ,नागपूर

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at http://www.aarhat.com/erj/

## प्रस्तावना –

जग हे जागतिक खेडे होत असताना समाजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आम्ही स्वागत करीत आहोत. पुढची पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय.

देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढत असला तरीपण, गुणवत्तेच्याबाबतीत काही प्रमाणात प्रश्नचिन्ह आहे. सुमारे ४०,००० कॉलेज व आठशेपेक्षा जास्त विद्यापीठे आहेत. परंतु, विद्यार्थी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के असून आता नव्या शैक्षणिक धोरणात ते २०३५ साली किमान ५० टक्क्यापर्यंत वाढविण्याचे उदिष्ट ठेवलेले आहे. १९८६ च्या शैक्षणिक धोरणातील अनेक मुद्दे मागील ३४ वर्षांत पूर्ण न होऊ शकल्याने त्यांचे पुनरावलोकन करून ज्या बाबी अपूर्ण आहेत, त्यात काही सुधारणा करण्याच्या संधी आहेत, याकडे लक्ष देण्यात आले. त्याचप्रमाणे, महिलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न, पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष, व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता या मुद्द्यांचाही विचार नवीन शैक्षणिक धोरणात केलेले आहे.

गरीब व श्रीमंत शिक्षणातील विषमता ही नवीन शैक्षणिक धोरणात विचारात घेतली आहे. म्हणून सरकारी आणि खासगी शाळेमध्ये शिक्षणात समानता आणायची भूमिका प्रामुख्याने मांडण्यात आली आहे. राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना करण्याची आणि

खासगी शाळांना अनियंत्रित फी वाढविण्यापासून रोखण्याची शिफारस नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेली आहे. शिक्षणाचा आकृतिबंध बदलण्यात आला आहे. हे धोरण बालवाडी, अंगणवाडीपासून ते उच्च शिक्षणामध्ये लागू असणार आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश आता औपचारिक शिक्षणात केला आहे. बालकांची जडणघडण हाच काळ महत्वाचा असतो, प्राथमिक स्तरावर भाषा, विज्ञान, वाचन, लेखन, गणित ते पायाभूत कौशल्ये विकासावर या नवीन धोरणात केलेला विचार हा भारताचे भविष्य घडविणार आहे. पाचवीपर्यंत दिले जाणारे शिक्षण हे मातृभाषेतून दिले जाणार असले तरीही ज्ञान भाषेतून शिक्षणाची सुविधा देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण अंतराष्ट्रीय दर्जाचे करण्याचा प्रयत्न केला आहे. बालवाडी आणि अंगणवाडी किंवा पहिले ते दुसरी पर्यंतच्या इंग्रजी शाळांचे पेव निर्माण झाले आहे. त्याला काही अंशी चाप लागेल. शिक्षणाचे ५+३+३+४ हे नवे सूत्र १० वी आणि १२ वी बोर्डाचे महत्व कमी करणार आहे. मुळात १० आणि १२ चे शिक्षण हे शालेय शिक्षण अंगीभूत शिक्षण म्हणून कौशल्य विकासात करण्याच्या दृष्टीकोनातून देणारे शिक्षण नव्यास शैक्षणिक धोराणामुळे शक्य होणार आहे. मुळात सहावीपासून व्यवसायिक शिक्षणाचा समावेश असल्या कारणाने शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना व्यवसायिक कौशल्ये प्राप्त करण्यास बळकटी देणारे शिक्षण याद्वारे देण्यात येईल.

तीन ते अठरा वर्षांपर्यंतची मुले नवीन शैक्षणिक धोरण हे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. राष्ट्राची प्रगती ही त्या राष्ट्राच्या शैक्षणिक बाबीवर अवलंबून असते. भारतात तब्बल ३४ वर्षांनतर शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर आपल्या विकासाच्या आशा पल्लवित होत असताना भारत एक विकसित सार्वभौम राष्ट्र म्हणून उदयास येत असताना आपल्या देशात शिक्षणाबाबतचा मागील पाच वर्षांपासून सुरु असलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ बाबत कस्तुरी रंगन समितीचा अहवाल स्वीकारून भारताने भविष्यकालीन योजना जाहीर केली आहे.

ISSN: P-2455-0515 E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–VIII, Issues– III May - June 2021

**निष्कर्ष -**

१९६६ मध्ये कोठारी आयोगाने शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) किमान ६ टक्के खर्च व्हावा, अशी शिफारस केली होती. परंतु, पण त्याची अंमलबजावणी अद्याप होऊ शकली नाही. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावर ६ टक्के खर्च व्हावा असे आवर्जून म्हटले आहे. मागील ३८ वर्षांत शिक्षणाची सुमार गुणवत्ता, पदवीधारकांच्या हाती कौशल्ये नसणे, शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण, शिक्षकांच्या योग्य मूल्यमापनाची प्रक्रिया नसणे, या सर्वच बाबींचा नवीन शैक्षणिक धोरण आणताना विचार करून प्रत्येक घटकाचा सांगोपांग विचार करण्यात आला आहे.

**संदर्भसूची-**

1) भारत मे समाज कल्याण - लेखक - अवधेश पाठक,
बेस्ट फ्रेंड पब्लिकेशन, इंदोर
2) शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि व्यवस्थापन, डॉ. शारदा शेवगेकर,
विद्या प्रकाशन, नागपूर
3) भारतीय प्रशासन, डॉ. सतिश ठोंबरे,
कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
4) व्यवस्थापन मुलतत्वे - प्रा. प्रभाकर देशमुख,
पिंपळापुरे ॲण्ड के. पब्लिकेशन, नागपूर
5) समाजकल्याण - डॉ. संजिव निंबाळकर,
केशव कृष्णा प्रकाशन, चंद्रपुर